आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ जानेवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई आणि नागपूर महापालिकेसाठी काँग्रेसचा, तर ठाणे महापालिकेसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- शाश्वत सामाजिक आणि आर्थिक भविष्यासाठी कुपोषणाच्या समस्येचं निराकरण आवश्यक असल्याचं केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांचं प्रतिपादन

- छत्तीसगडच्या धमतारी जिल्ह्यात गोबरा नक्षलवादी संघटनेची कमांडर भूमिका हिचं आत्मसमर्पण

- ब्रिटिश कनिष्ठ खुल्या स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंह हिची १९ वर्षांखालच्या गटात अंतिम फेरीत धडक

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज ‘मिशन मुंबई’ हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात मुंबई महानगरपालिकेच्या बंद पडलेल्या मराठी शाळा सुरू करणं, शाळांमध्ये योग्य व्यवस्था उपलब्ध करणं, बेस्ट बसेस वाढवणं, मुंबईकरांना चांगली आरोग्य व्यवस्था, स्वच्छ पाणी आणि हवा देणं यासारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. मिशन मुंबई ही केवळ निवडणुकीची घोषणा नसून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून शहराचा सर्वांगीण विकास घडवण्याचा निर्धार आहे, असं प्रतिपादन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी केलं. वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षाचा गवई गट, राष्ट्रीय समाज पक्ष यांच्यासोबत काँग्रेस ही निवडणूक लढवत आहे.

नागपूर महापालिकेसाठीचाही काँग्रेसचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा ठाम संकल्प, २० सूत्रांच्या या जनहितकारी आराखड्यात आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

<><><><>

भाजपानं ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठीचा ‘ठाणे निर्धारनामा’ हा जाहीरनामा आज प्रसिद्ध केला. या महापालिका निवडणुकीत किमान १०० नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार भाजपानं केला आहे. ठाण्यासाठी स्वतंत्र धरण बांधणं, नागरिकांना २४ तास पाणी पुरवणं आणि जुन्या, गळणाऱ्या पाइपलाइनसाठी विशेष निधीचं आश्वासन यात असल्याचं आमदार संजय केळकर यांनी सांगितलं. ठाणे शहरातल्या १९७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचं काँक्रिटीकरण करण्याचं आश्वासन यात आहे.

<><><><>

विकसित भारताच्या निर्मितीसाठी तसंच देशाच्या शाश्वत सामाजिक आणि आर्थिक भविष्यासाठी कुपोषणाच्या समस्येचं निराकरण करणं आवश्यक असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास मंडळातर्फे नवी दिल्लीत आयोजित सीएसआर परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. कुपोषणाची मूळ कारणं दूर करण्यात महिला आणि बाल विकास मंत्रालयाची भूमिका महत्त्वाची आहे, असं त्यांनी सांगितलं. गर्भवती महिला आणि मुलांच्या वाढत्या वयात पोषण चांगलं झालं, तर निरोगी पिढी तयार होते, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

ग्लोबल एआय इम्पॅक्ट परिषदेचं आयोजन येत्या फेब्रुवारी महिन्यात भारतात होणार असल्याची माहिती केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी

वैष्णव यांनी आज दिली. या परिषदेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून सर्व राज्यांमध्ये प्रादेशिक एआय शिखर परिषदेचं आयोजन करण्यात येत आहे. त्यापैकी राजस्थानमधल्या परिषदेला वैष्णव यांनी दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं.

***होल्ड... बाईट- अश्विनी वैष्णव***

भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेवर सुमारे ७० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होत आहे. ही गुंतवणूक अत्यंत महत्वाची आहे, असं ते म्हणाले. ‘इंडिया एआय मिशन’ अंतर्गत अनेक नवीन प्रयोग, ॲप्लिकेशन्स आणि तंत्रज्ञान विकास प्रकल्पांचा समावेश असल्याचं त्यांनी संगितलं.

**<><><><><>**

नर्सरीपासून उच्च दर्जाच्या संशोधनाच्या संधी भारतीय भाषांमध्ये निर्माण झाल्या पाहिजे. यासाठीच किमान पाचवीपर्यंत शिक्षण मातृभाषेत दिलं जावं याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. देशातल्या ५ अभिजात भाषांमधल्या ५५ दुर्मिळ आणि महत्त्वांच्या पुस्तकांचं प्रकाशन प्रधान यांनी आज नवी दिल्लीत केलं. त्यावेळी ते बोलत होते. तमिळ, तेलगु, मल्याळम, कन्नड आणि ओडिया भाषेतली ही पुस्तकं आहेत. सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ इंडियन लँग्वेजेस या संस्थेनं यांचं प्रकाशन केलं आहे. याशिवाय तिरुक्कुरल साहित्याच्या  चिन्ह भाषेतल्या रुपांतर मालिकेतल्या १३ पुस्तकांचं प्रकाशनही प्रधान यांनी केलं.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणानंतर निवडणूक आयोगाने आज प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. या यादीत १२ कोटी ५५ लाख ५६ हजार २५ मतदारांची नावं समाविष्ट आहेत, असं उत्तरप्रदेश राज्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी लखनौ इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. सध्याच्या मतदार यादीतल्या ८१ पूर्णांक ३० शतांश टक्के मतदारांनी आपलं नाव प्रारूप मतदार

यादीसाठी नोंदवल्याची माहिती त्यांनी दिली. सध्याच्या मतदार यादीत १५ कोटी ४४ लाख ३० हजार ९२ मतदार आहेत. त्यापैकी २ कोटी ८९ लाख मतदारांची नावं प्रारूप मतदार यादीत आली नाहीत. तर ४६ लाख २३ हजार मतदारांचा मृत्यू झाल्याचं आढळून आलं आहे, असंही रिनवा यांनी सांगितलं. २ कोटी १७ मतदारांची नावं बीएलओना सापडली नाहीत, तसंच २५ लाख ४७ हजार मतदारांची नावं दुबार आढळली आहेत. प्रारूप मतदार यादीवर ६ फेब्रुवारीपर्यंत आक्षेप नोंदवता येतील, या आक्षेपांवर २७ फेब्रुवारीपर्यंत निर्णय घेतला जाईल असं रिनवा यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या धमतारी जिल्ह्यात आज एका नक्षली महिलेनं आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. भूमिका, उर्फ सोमारी नावाच्या या महिलेचा अनेक नक्षली कारवायांमध्ये सहभाग होता. तसंच नक्षलवाद्यांच्या गोबरा या संघटनेची 'कमांडर' म्हणून तिनं काम केलं होतं, अशी माहिती धमतारी इथल्या पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

देशात व्यवसाय करणं सुलभ कसं होईल याकडे गेल्या अकरा वर्षांत केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केलं. विविध अडथळ्यांच्या शर्यतीतून वाट काढत देशात व्यवसायाला अनुकूल वातावरण तयार करण्यात आलं. १९९१ हे आर्थिक सुधारणांचं वर्ष समजलं जातं तसं २०२५ हे नियंत्रणमुक्तीचं वर्ष ठरलं आहे. याविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी***

*देशाला लाभलेल्या समुद्र किनाऱ्यांमार्गे होणाऱ्या व्यापारात २०२५ मध्ये लक्षणीय वाढ झाली. २०१३-१४ मध्ये भारतीय बंदरांवर येणारी जहाजं जवळपास चार दिवस निष्क्रीय उभी राहत होती. त्यामुळे आर्थिक नुकसान होत होतं. यावर तोडगा काढण्यासाठी संसदेने*

*२०२५ मध्ये पाच आधुनिक सागरी कायदे आणले. या कायद्यांमध्ये किनारी वाहतूक, समुद्र मार्गाने होणारी मालवाहतूक, व्यापारी जहाज वाहतूक आणि बंदरांवरचं प्रशासन यांचा समावेश आहे. या सुधारणांमुळे सागरी व्यापारावरच्या प्रशासन व्यवस्थेचं आधुनिकीकरण झालं. त्याशिवाय, २०२५ मध्ये भारतातल्या सक्रिय कंपन्यांची संख्या २०१४ च्या तुलनेत जवळपास दुप्पट झाली. व्यवसाय सुलभतेसाठी आखलेल्या धोरणांचं हे फलित आहे. जनविश्वास १ आणि २ च्या माध्यमातून २००पेक्षा जास्त किरकोळ तांत्रिक गुन्हे, गुन्हेगारीच्या कक्षेतून वगळण्यात आले आणि शेकडो कालबाह्य तरतुदी काढून टाकण्यात आल्या.*

**<><><><><>**

दिल्लीतली वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सीमांवरचे पथकर नाके तात्पुरते बंद करण्याच्या किंवा दुसरीकडे हलवण्याच्या प्रकरणाची सुनावणी दोन महिने पुढे ढकलण्याची मागणी केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं आज हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाची कानउघडणी केली. आयोग आपलं काम करत नसल्याची टीका सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं केली.

**<><><><><>**

भारताची स्क्वॉशपटू अनाहत सिंह हिनं पहिल्यांदाच ब्रिटिश कनिष्ठ खुल्या स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेत १९ वर्षांखालच्या गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीत तिनं इजिप्तच्या मलिका एल कारास्की हिच्यावर ११-८, ११-७, ११-९ अशी मात केली. आता अनाहतचा सामना युरोपीय अजिंक्यपद विजेती फ्रान्सची लॉरेन बाल्टयान हिच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांनी मलेशिया खुल्या सुपर 750 स्पर्धेत पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला आहे. लक्ष्य यानं अटीतटीच्या सामन्यात सिंगापूरच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव केला. उद्या त्याचा

पुढचा सामना हाँगकाँगच्या खेळाडूशी होणार आहे. तर आयुष शेट्टी यानं मलेशियाच्या खेळाडूवर थेट गेम्समधये मात केली. महिला एकेरीत मात्र मालविका बनसोड हिला पहिल्याच फेरीत पराभवाचा धक्का बसला. पुरुष दुहेरीतही भारताची जोडी स्पर्धेबाहेर पडली.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे खासदार सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर यावेळी उपस्थित होते. कलमाडी यांचं आज पहाटे वयाच्या ८२व्या वर्षी प्रदीर्घ आजारानं पुण्यात निधन झालं. कलमाडी हाऊस या त्यांच्या निवासस्थानी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कलमाडी यांचं अंत्यदर्शन घेतलं. पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

**//<><><><><>//**